गोकुळ शिरगाव CR No. 98/25

मे. मुख्य / प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारीसो, कोल्हापूर

यांचे कोर्टात

म. सरकार ---- फिर्यादी

विरुध्द

बाबासाहेब पारिसा लबाजे
व.व. ८२ धंदा - शेती
रा. कणेरीवाडी, ता. कागल, जि. को. ---- आरोपी

भा. ना. सु. स. कलम ~~४३८~~/४८० /४८२ प्रमाणे अर्ज

गुन्हा : 306 etc BNS.

यातील आरोपी तर्फे विनंती की

प्रस्तुत कामी यातील आरोपी / आरोपींचेवर वरील गुन्हा तोहमत असून आरोपीचा / आरोपींचा आज मे. कोर्टात जामीन देत आहे तरी कृपया आरोपीचा / आरोपींचा जामीन स्विकारुन आरोपीस / आरोपींना खुले करणेत यावी ही विनंती.

१. आरोपीने / आरोपींनी कोणत्याही प्रकारचा गुन्हा केलेला नाही.

२. आरोपी हा / हे कोल्हापूर येथील कायम रहिवाशी असून आरोपीचे स्वत:चे मालकीचे / मालकीची घर व जमीनजुमला आहे आरोपीस / आरोपींना जामीनावर सोडलेस ते कोठेही पळून जाणार नाहीत.

३. आरोपी हा / हे प्रत्येक तारखेस कोर्टात वेळेवर हजर राहील / राहतील. पळून जाणार नाहीत.

४. आरोपी हा / हे अटकेत राहिल्यास त्यांचे कौटुंबिक फार नुकसान होणार आहे.

५. आरोपीस / आरोपींना जामीनावर सोडलेस तो / ते सरकारी / फिर्यादी पक्षाचा पुरावा फोडणार नाही अगर त्याचेवर कोणत्याही प्रकारचा दबाव आणणार नाही.

६. आरोपी हा / हे कोर्टाच्या हुकूमाप्रमाणे योग्य व लायक जामीन देणेस तयार आहे.

७. आरोपी हा / हे कोर्टाच्या हुकूमाप्रमाणे अटी व शर्तीचे पालन करणेस तयार आहे.

तरी कृपया वरील सर्व कारणांचा सहानुभूतीपुर्वक विचार होऊन आरोपीस / आरोपींना जामीनावर खुले करण्यात यावे अशी नम्र विनंती आहे.

८. सदर आरोपी हे वृद्ध असून त्यांचे व.व. ८२ आहे. ते आरोग्यिक रित्या अक्षम असून त्यांना न्यायालयीन कोठडीत राहिल्यास आरोग्याचा प्रश्न निर्माण होवू शकतो.

O
I.O. to APP to say 09/12/25
8/12/25
JMFC

कोल्हापूर

तारीख 8/12/25

म. जा. व्हावे.

Adv K. V. Patil

12/12/25

**ORDER ON BAIL APPLICATION IN C.R. NO.98/2025 REGISTERED WITH GOKUL SHIRGAON POLICE STATION, KOLHAPUR.**

Accused No.1 namely, Babaso Parisa Labaje has filed present application to release him on bail under Section 480 of Bhartiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 for offence punishable under Section 108 of the BNS, 2023 and under section 39 r/w. Sec.45 of the Maharashtra Money Lending (Regulation) Act, 2014.

**02.** It is contention of the accused that he did not commit any offence. He is resident of Kolhapur and he has landed properties therein. Therefore, he will not abscond, if application is allowed. Further, he will not tamper the prosecution evidence. If he detained in jail, his family will suffer. Also accused No.1 is 82 years old. Therefore, he is not medically fit. If he detained in jail, question regarding his health will arise. He is ready to abide each and every terms and conditions imposed by this Court. Hence, he prayed to release him on bail.

**03.** Investigating officer resisted the application by filing her say and submitted that if application is allowed then he will tamper the prosecution evidence. Also accused has threatened the informant and his mother. Thus, she prayed to reject the application.

**04.** Ld. APP for the State also resisted the application by filing her say. She contended that, offence is serious in nature and non-bailable. Also, said offence is triable by Court of Session, Kolhapur, and is punishable with imprisonment up to ten years. She also reiterated the submissions of I.O. Prosecution also filed Judgments RCC 49/2007 and 32/2008, Appeal No.167/2020 to show the criminal antecedent against the present accused. Thus, she prayed to reject the application.

**05.** Also informant filed his say to this application and submitted that, accused has been doing business of Money Lending. Assistant Registrar, Co-operative Society has filed report regarding it on 21/01/2025. Accused No.1 is master mind of this offence. Also informant

12-12-2025

filed electronic evidence on record. Also accused is habitual and he is convicted in RCC No.49/2007 and RCC No.30/2008 by Ld. J.M.F.C. Court, Kagal. Also Hon'ble District Court and Hon'ble High Court rejected the anticipatory bail application of the accused. Also, offence is triable by Court of Session, therefore, this Court has no jurisdiction to entertain this application. Therefore, he prayed to reject the application with cost.

**06.** Heard Ld. Advocate for the accused and Ld. APP. for the State. They argued in consonance with their application and say.

**07.** Perused Record. Admittedly, offence punishable under Section 108 of the BNS, 2023 is punishable with imprisonment up to ten years and the offence is exclusively triable by the Session's Court. It is also noted that offence is serious in nature and there are criminal antecedent against the accused, accused is habitual in nature. Accused is found convicted in RCC No.49/2007 and RCC No.30/2008. It is also strong allegation by the informant through the prosecution that despite of the this matter pending, on 28/04/2025 accused has threatened to the informant that he will burry the informant and his family member under the alleged land. Therefore, informant filed the complaint against the present accused and same is reported as NCR No.225/2025 at Gokulshirgaon Police Station. In addition to this there is as such no medical record on record which shows that accused is having medical difficulty or having any serious illness. Hence, considering all these aspect and from the appearance of the accused it is nowhere revealed that accused is infirm or having any sickness. Therefore, in the interest of justice I pass following order.

**- ORDER -**

Application is rejected.

12.12.2025.

**Date:- 12.12.2025.**

**( A.A. Pathan)**

**07th Judicial Magistrate First Class, Kolhapur.**

महाराष्ट्र पोलीस

गोकुळ शिरगांव एमआयडीसी पोलीस ठाणे ता.करवीर जि.कोल्हापूर
कार्यालय :- गोकुळ चौक,गोकुळ शिरगांव एमआयडीसी.
पिन नं. ४१६२३४ संपर्क :- ०२३१-२६७१९३३
ई मेल :- gokulshirgaonps.kop@mahapolice.gov.in

जावक क्रमांक :-1282/२०२५ पोलीस ठाणे- गोकुळ शिरगांव दि. २६.३.२०२५

प्रति,

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो,
कोर्ट कोल्हापूर

यांना सविनय सादर...

**प्रतिवेदक :-** तबस्सुम जे मगदुम, सहा. पोलीस निरीक्षक, गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे,
यांजकडून विनंती पुर्वक की,

**विषय :-** आरोपीत यांची ७ दिवस पो. क. रिमांड मंजुर होयून मिळणे बाबत. . .

महोदय,

| | | | |
|---|---|---|---|
| १) | पोलीस ठाणे | :- | गोकुळ शिरगाव जिल्हा कोल्हापूर |
| २) | गु. र. नं. व कलम | :- | ९८ / २०२५ भा. दं. वि. सं. क. १०८, महाराष्ट्र सावकारी ( नियमन ) अधिनियम २०१४ चे कलम ३९, ४५ |
| ३) | फिर्यादीचे नांव पत्ता | :- | आकाश नागोंडा पाटील व व २६ रा. हलसवडे ता. करवीर जि कोल्हापुर |
| ४) | आरोपीचे नांव पत्ता | :- | १) बाबासो पारीसा लबाजे रा. कसबा सांगाव ता. कागल जि कोल्हापुर , २) मधुकर बसाना मगदुम व व ५२ रा. पिपंळगाव ता. कागल जि. कोल्हापुर **३) बाळगोंडा आण्णा पाटील व व ५२ रा. हलसवडे ता करवीर** यातील आरोपी क्र २ यास दिनांक २४.३.२०२५ रोजी २२:०७ वा अटक करणेत आली असुन त्याची दिनांक २७.३.२०२५ रोजी पर्यंत मॅ क रिमांड मंजुर **आरोपी क्र ३ यास दिनांक २६.३.२०२५ रोजी १३:२४ वा अटक करणेत आली आहे.** |
| ५) | गुन्हा घ. ता. वेळ ठिकाण | :- | दिनांक २४.३.२०२५ रोजी सकाळी ०९:१५ वा चु पूर्वी राजगोंडा व महादेव पाटील याचे शेती गट नं ६१७ मध्ये लिंबाच्या झाडाला हलसवडे ता करवीर |
| ६) | गुन्हा दाखल तारीख वेळ | :- | दि. २४.३.२०२५ रोजी १८:३९ वा |
| ७) | गुन्हयातील मयत | :- | नागोंडा शंकर पाटील व व ५२ रा. हलसवडे ता करवीर |
| ८) | गुन्ह्याचा हेतु | :- | आत्महत्येस प्रवृत्त करणे केलेने |
| ९) | हकिगत | :- | यात हकिकत अशी कि यातील आरोपी नं.१ हा बेकायदेशीर सावकारी |

व्यवसाय करीत असुन त्याचेकडुन यातील मयत याने जुलै २०२२ मध्ये दरमहा दोन टक्के व्याजाने पाच लाख रुपये घेतले होते. त्या रक्कमेला सेक्युरिटी म्हणुन आरोपी क्र १ याने मयताची शेती १९ गुंठे शेती ही नांवावर करुन घेतली. त्यानंतर यातील मयत हा कर्ज व त्यावरील दोन टक्के व्याज असे मिळुन ६,६०,०००/- रुपये असे आरोपीत यास देणेस गेले असता आरोपीत याने चार टक्के व्याज याप्रमाणे २९ लाख रुपये मागणी केल्याने सदर बाबत यातील मयत यांनी मा.

आरोपी हजर
मिळाला

जिल्हा उपनिबंधक याचे कडे तक्रार केली असतामा. जिल्हा उपनिबंधक यांनी देखील ता. २१.१.२०२५ रोजी आरोपी नं. १ हे विनापरवाना अवैदय सावकारीचा व्यवहार करतात असा अहवाल दिला असुन सदर शेती संदर्भात दुय्यम निबंधक कार्यालयातील कागद रदद व्हावा करीता ता. ५८५/२०२४ रोजी दावा दाखल केला आहे. तो न्यायप्रविष्ठ आहे. आरोपी क्र १ हा फिर्यादीचे वडिल यातील मयत यास व्याजाची रक्कम वसुल करणेसाठी भेटेल तेथे धमकी व त्रास देत असुन त्या त्रासास कंटाळुन व आरोपी नं. २ याने मयताचे हातउसने घेतलेले २,५०,००० रुपये वेळोवेळी मागुन देखील परत देत नसल्याने सदर फिर्यादीचे वडिल यांनी दिनांक २४.३.२०२५ रोजी सकाळी ०९:०० वा चे पुर्वी नॉयलॉन दोरीचे साहयाने गळफास लावुन घेवुन आत्महत्या केलेबाबत यातील फिर्यादी यांनी दिले फिर्यादीवरुन गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाचा तपास सुरु असताना यातील फिर्यादी यांनी दिनांक २५.३.२०२५ रोजी पुरवणी जबाब दिला त्यातील मजकुर पाहता--- खाजगी सावकार बाबासो पारीसा लबाजे यांचे आमचे गावातील मित्र बाळगोंडा आण्णासो पाटील हे सुध्दा मी तसेच माझे वडील असे घरी असताना घरी येवुन माझे वडीलांना तु बाबासो लबाजे यांचे पैसे कधी देणार आहेस त्यांचे पैसे लवकरात दे नाहीतर तुझी लिहुन घेतलेली शेती आम्ही कसायला सुरुवात करतो असे वारंवार धमकी देत होते. दिनांक २२.३.२०२५ रोजी सुध्दा मी तसेच वडील नागोंडा असे घरी असताना बाळगोंडा आण्णासो पाटील हे आले व पुन्हा त्यांनी बाबासो लबाजे हे रान नांगरट करणार आहेत तुला काय करायचे ते कर असे म्हणुन धमकी देवुन गेला होता तेव्हा पासुन वडील नागोंडा हे मला आता हा सुध्दा धमकी द्यायला लागला यामुळेच जीव नकोसा झाला आहे असे मला बोलत होते. म्हणुन माझी बाळगोंडा आण्णासो पाटील रा. हलसवडे ता करवीर हे सुध्दा बाबासो पारीसा लबाजे यांचेप्रमाणेच माझे वडीलांना आत्महत्येस प्रवृत्त करणेस जबाबदार आहेत माझी बाळगोंडा आण्णासो पाटील रा. हलसवडे ता करवीर यांचेविरुध्द तक्रार आहे. अशा वगैरे मजकुरची हकीकत सांगत असल्याने तसा त्याचा सविस्तर जबाब नोंदवुन घेतला.

सदर गुन्ह्याचे तपासाचे अनुषंगाने यातील आरोपी क्र ३ यास सदर गुन्ह्याचे तपासकामी दि. २६.३.२०२५ रोजी १३:२४ वा अटक करणेत आली असुन त्याचे अटकेची समज त्यांचे नातेवाईक अनिकेत सदाशिव पाटील रा. हलसवडे ता करवीर यांना त्यांचा मोबाईल नं ९८३४४१३२४२ यावर देणेत आली आहे.

सदर गुन्हयातील आरोपी क्र १ यास अटकपूर्व वैद्यकीय तपासणी करीता घेवुन गेले असता मा वैद्यकीय अधिकारी सो यांनी त्यास अनफिट असलेबाबत सांगितल्याने त्यास सदर गुन्ह्याचे कामी अटक करणेत आलेली नाही. तो सद्या बी पी शुगर चा त्रासामुळे उपचार घेत असल्याचे समजत असुन त्याचा डिस्चार्ज होताच त्यास सदर गुन्ह्याचे तपासकामी अटक करणेची आहे.

आरोपीत याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता सदर गुन्हयातील मयत याने आरोपी क्र ३ यास सन २०२२ साली त्यास पैशाची आवश्यकता असुन त्याचे हलसवडे येथील शेत विक्री करणेचे आहे असे सांगितले होते त्यावेळी आरोपी क्र १ यांना शेतजमीनीची आवश्यकता असल्याने आरोपी क्र १ याने यातील मयत यास पैसे दिले होते त्यानंतर वेळोवेळी यातील मयत यांना आरोपी क्र १ याने आरोपी क्र ३ यांचे सांगणेवरुन पैसे दिले होते तरीसुध्दा यातील मयत हे जमीनीचा व्यवहार न करता चालढकल करीत असल्याने आरोपी क्र १ व ३ यांनी यातील मयत यास विश्वासात घेवुन त्याची शेतजमीन खरेदी दस्ताने खरेदी केली व सदर जमीनीचा कब्जा घेतला असे सांगितले. यातील मयत याने जरी आरोपी क्र १ याने विक्री केली असली यातील मयत याचे विनंती वरुन यातील मयत हाच जमीन कसत होता असे सांगत आहे. परंतु आरोपी क्र १ याने यातील मयत यास व्याजाने पैसे दिले होते किंवा कसे याबाबत उडवाउडवीची उत्तरे देत असुन काही समाधानकारक माहिती देत नाही.

**-: पोलीस कस्टडी रिमांड मागणेची कारणे :-**

१) सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे.

२) सदर गुन्हयातील मयत यास आरोपीत यांचेकडुन मानसिक त्रास होता का ? याबाबत आरोपीत यास विश्वासात घेवुन तपास करणेचा आहे.

३) यातील आरोपीत क्र ३ हा यातील मयत याने आरोपी क्र १ याचे कडुन पैसे घेतले होते असे सांगत आहे पण त्याने सदरचे पैसे हे शेतजमीनीच्या बदल्यात घेतले होते असे सांगतो अन्य काही माहिती देणेस टाळाटाळ करीत असुन त्यास विश्वासात घेवुन अधिक तपास करणेचा आहे.

४) सदर गुन्हयातील मयत याने आरोपी क्र १ व ३ हे खाजगी सावकारकी करीत असुन त्याचेविरुध्द गुन्हा दाखल करणेत यावा याबाबत मा सहा. निबंधक सहकारी संस्था ता करवीर यांचेकडे तक्रारी अर्ज दाखल केला होता त्याचा न्यायनिर्णय होवुन आरोपी क्र १ हा अवैद्यरित्या खाजगी सावकारकीचा व्यवसाय करीत असल्याचे सकृतदर्शनी सिध्द होत असल्याचे नमुद केले आहे. आरोपी क्र ३ हा सुध्दा आरोपी क्र १ याचे प्रत्येक व्यवहारामध्ये सामील असल्याचे फिर्यादी यांचेकडुन सांगणेत येत आहे त्याप्रमाणे आरोपीत यास विश्वासात घेवुन तपास करणेचा आहे.

५) यातील मयत यांनी मा सहा. निबंधक सहकारी संस्था ता करवीर याचेकडे आरोपी क्र १ व ३ यांचेविरुध्द तक्रार अर्ज दाखल केला होता त्योवळी त्यांनी सदर गुन्ह्यातील मयत, आरोपी क्र १ व ३ यांचे दृष्टी फोरन्सिक यांचेकडील ऑडीओ रेकॉर्डींगच्या प्रती सामील केल्या होत्या त्याचे अवलाकन केले असता यातील आरोपी क्र १, ३ व यातील मयत यांचे संभाषणामध्ये व्याजाचा उल्लेख दिसुन येतो त्याप्रमाणे आरोपीत यास विशवासात घेवुन तपास करणेचा आहे.

६) सदर गुन्हयाचे तपासामध्ये मयत याने आत्महत्या करणेस अन्य कोणते कारण आहे का ? याबाबत आरोपीत यांना विश्वासात घेवुन तपास करणेचा आहे.

७) आरोपी क्र १ हा सद्या त्याचे बी पी शुगर चा त्रासाने उपचार घेत असल्याचे समजत असुन त्यास सदर गुन्ह्याचे तपासकामी अटक करणेची आहे. आरोपी क्र १ व ३ यांची एकत्रित नौकशी करणे गरजेच आहे.

८) यातील आरोपी क्र १ हा खाजगी सावकारकीचा व्यवसाय करीत असुन आरोपी क्र ३ हा गरजु लोकांना आरोपी क्र १ यांचेकडुन व्याजाने पैसे घेणेकरीता प्रवृत्त करीत असतो व पुन्हा आरोपी क्र १ व ३ हे संगणमताने ज्यांना व्याजाने पैसे दिले आहेत त्यांचेकडुन त्यांच्या शेतजमीनी खरदी करीत असल्याची माहिती समोर आली आहे त्या दृष्टीने तपास करणेचा आहे.

तरी वरील कारणास्तव आरोपीत यांची आज दि. २६.३.२०२५ रोजी पासुन ७ दिवस पो. क. रिमांड मिळणेस विनंती आहे.

सोबत आरोपीत यांना योग्य त्या बंदोबस्तात हजर केले आहे.

मा. सविनय सादर

**तबस्सूम जे मगदूम**
**सहा.पोलीस निरीक्षक**
**गोकूळ शिरगांव पोलीस ठाणे**

## ORDER BELOW REMAND APPLICATION IN C. R. No.98/2025 OF GOKUL SHIRGAON POLICE STATION

Accused No.3 namely, Balgonda Anna Patil is produced before me by API Smt Tabassum Magdum, attached to Gokul Shirgaon Police Station, Kolhapur at 3.25 p.m. He has no complaint of ill-treatment at the hands of police. Further punishment for the offence punishable under section 108 of BNS is imprisonment of either description for a term which may extend to 10 years and shall also liable to fine. Hence, notice contemplated under section 35 of BNSS is not required in present offence. Further I. O. Provided intimation to the accused and his relatives as per section 47 and 48 of B.N.S.S. Accused No.3 is represented through Ld. Advocate Shri.V.V. Patil. I.O. prayed for 7 days PCR of the accused. I.O. is present. Case diary is produced.

**02.** Leaned APP Shri. Powar and I.O. argued that in order to ascertain involvement of present accused and detail investigation of the offence physical custody of the accused is necessary. On the other hand, Ld. Advocate for the accused argued that civil litigation is pending between present accused and deceased. Hence, in order to counter said litigation the accused is falsely rope in present offence. He argued that no discovery or recovery is pending at the instance of present accused. Hence, he prayed for MCR. Ld. Advocate for the de-facto complainant also present and argued that, accused No.1 is yet to be arrested. He vehemetly argued that I.O. intentionally failed to arrest the accused No.1. Further, he argued that accused No.3 is agent of accused No.1. Hence, he prayed for PCR of the accused.

**03.** From perusal of case diary and remand report it appears that accused No.3 is arrested on 26/03/2025 at about 13.24 hrs. After perusal of the remand papers and case diary it appears that offence is

serious in nature. Furthermore, it appears that name of present accused is revealed during investigation. Hence, in order to detail investigation to that regard police custody of the accused is necessary. Hence, reasons mentioned in remand report are prima-facie satisfactory to grant police custody of the accused. Accordingly, I pass following order.

**-ORDER-**

| | |
|---|---|
| 1. | Accused No.3 namely, Balgonda Anna Patil is remanded to P.C.R. till 28/03/2025. |
| 2. | Copy of order be sent to Hon'ble CJM for information. |

Date – 26/03/2025.
Kolhapur.

(S. D. Shirsat)
9th Judicial Magistrate First Class,
Kolhapur.

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

गोकुळ शिरगांव एमआयडीसी पोलीस ठाणे ता.करवीर जि.[illegible]पूर

कार्यालय :- गोकुळ चौक, गोकुळ शिरगांव एमआयडीसी.

पिन नं. ४१६२३४ संपर्क :- ०२३१-२६७[illegible]३३

ई मेल :- gokulshirgaonps.kop@mahapolice.gov.in

जावक क्रमांक :- १३०७/२०२५ पोलीस ठाणे- गोकुळ शिरगांव दि. २८.३.२०२५

**प्रति,**

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो,

कोर्ट कोल्हापूर

यांना सविनय सादर...

**प्रतिवेदक :-** तबस्सुम जे मगदुम, सहा. पोलीस निरीक्षक, गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे,

यांजकडून विनंती पुर्वक की,

**विषय :-** आरोपीत यांची ५ दिवस पो. क. रिमांड मंजुर होवून मिळणे बाबत. . .

महोदय,

| | | |
|---|---|---|
| १) पोलीस ठाणे | :- | गोकुळ शिरगाव जिल्हा कोल्हापूर |
| २) गु. र. नं. व कलम | :- | ९८ / २०२५ भारतीय न्याय संहिता कलम १०८, महाराष्ट्र सावकारी ( नियमन ) अधिनियम २०१४ चे कलम ३९, ४५ |
| ३) फिर्यादीचे नांव पत्ता | :- | आकाश नागोंडा पाटील व व २६ रा. हलसवडे ता. करवीर जि कोल्हापुर |
| ४) आरोपीचे नांव पत्ता | :- | १) बाबासो पारीसा लबाजे रा. कसबा सांगाव ता. कागल जि कोल्हापुर ,<br>२) मधुकर दत्तात्रय मगदुम व व ५२ रा. पिपंळगाव ता. कागल जि. कोल्हापुर<br>**३) बाळगोंडा आणण्णा पाटील व व ५२ रा. हलसवडे ता करवीर**<br>यातील आरोपी क्र २ यास दिनांक २४.३.२०२५ रोजी २२:०७ वा अटक करणेत आली असुन त्याची दिनांक ९.४.२०२५ रोजी पर्यंत मॅ क रिमांड मंजुर<br>**आरोपी क्र ३ यास दिनांक २६.३.२०२५ रोजी १३:२४ वा अटक करणेत आली असुन त्याची दिनांक २८.३.२०२५ रोजी पर्यंत पो क रिमांड मंजुर.** |
| ५) गुन्हा घ. ता. वेळ ठिकाण | :- | दिनांक २४.३.२०२५ रोजी सकाळी ०९:१५ वा चु पूर्वी राजगोंडा व महादेव पाटील याचे शेती गट नं ६१७ मध्ये लिंबाच्या झाडाला हलसवडे ता करवीर |
| ६) गुन्हा दाखल तारीख वेळ | :- | दि. २४.३.२०२५ रोजी १८:३९ वा |
| ७) गुन्हयातील मयत | :- | नागोंडा शंकर पाटील व व ५२ रा. हलसवडे ता करवीर |
| ८) गुन्ह्याचा हेतु | :- | आत्महत्येस प्रवृत्त करणे केलेने |

९) हकिगत :- यात हकिकत अशी कि यातील आरोपी नं.१ हा बेकायदेशीर सावकारी व्यवसाय करीत असुन त्याचेकडुन यातील मयत याने जुलै २०२२ मध्ये दरमहा दोन टक्के व्याजाने पाच लाख रुपये घेतले होते. त्या रक्कमेला सेक्युरिटी म्हणुन आरोपी क्र १ याने मयताची शेती १९ गुंठे शेती ही नांवावर करुन घेतली. त्यानंतर यातील मयत हा कर्ज व त्यावरील दोन टक्के व्याज असे मिळुन ६,६०,०००/- रुपये असे आरोपीत यास देणेस गेले असता आरोपीत याने चार टक्के व्याज याप्रमाणे २९ लाख रुपये मागणी केल्याने सदर बाबत यातील मयत यांनी मा.

जिल्हा उपनिबंधक याचे कडे तक्रार केली असतामा. जिल्हा उपनिबंधक यांनी देखील ता. २१.१.२०२५ रोजी आरो नं. १ हे विनापरवाना अवैदय सावकारीचा व्यवहार करतात असा अहवाल दिला असुन सदर शेती संदर्भात दुय्यम निबंधक कार्यालयातील कागद रदद व्हावा करीता ता. ५८५/२०२४ रोजी दावा दाखल केला आहे. तो न्यायप्रविष्ठ आहे. आरोपी क्र १ हा फिर्यादीचे वडिल यातील मयत यास व्याजाची रक्कम वसुल करणेसाठी भेटेल तेथे धमकी व त्रास देत असुन त्या त्रासास कंटाळुन व आरोपी नं. २ याने मयताचे हातउसने घेतलेले २,५०,००० रुपये वेळोवेळी मागुन देखील परत देत नसल्याने सदर फिर्यादीचे वडिल यांनी दिनांक २४.३.२०२५ रोजी सकाळी ०९:०० वा चे पुर्वी नॉयलॉन दोरीचे साहयाने गळफास लावुन घेतुन आत्महत्या केलेबाबत यातील फिर्यादी यांनी दिले फिर्यादीवरुन गुन्हा दाखल आहे.

यातील फिर्यादी यांनी सदर गुन्ह्यातील मयत, आरोपी क्र १ व ३ यांचे दृष्टी फोरन्सिक यांचेकडील ऑडीओ रेकॉर्डींगच्या प्रती सामील केल्या होत्या त्याचे अवलाकन केले असता यातील आरोपी क्र १, ३ व यातील मयत यांचे संभाषणामध्ये व्याजाचा उल्लेख दिसुन येतो त्यामुळे सदर गुन्ह्याचे तपासाचे अनुषंगाने आरोपी क्र १ व ३ यांचे व्हॉईस रेकॉर्डिग सॅम्पल घेणे गरजेचे असल्याने मा. उपसंचालक सो, प्रादेशीक न्याय सहाय्यक वैज्ञानीक प्रयोगशाळा, गोळीबार मैदान, कसबा बावडा, कोल्हापुर यांना सदर गुन्हयातील अटक आरोपी नामे बाळगोंडा अण्णा पाटील रा. हलसवडे ता करवीर यांचे व्हॉईस सॅम्पल घेणेबाबत रिपोर्ट देणेत आला होता त्याचप्रमाणे सदर गुन्हयातील फिर्यादी आकाश नागोंडा पाटील रा. हलसवडे ता करवीर यांना त्यांचा मो नं ९५०३३७९०९० यावर संपर्क साधुन ऑडिओ रेकॉर्डिंग असलेला सदर गुन्हयातील मयत याचा मोबाईल तपासाकामी हजर करणेबाबत सुचना देणेत आली होती त्यावेळी फिर्यादी नामे आकाश पाटील यांनी घरी गोड जेवणाचा कार्यक्रम आहे पाहुणे आहेत कार्यक्रम संपल्यानंतर मोबाईल घेवुन पोलीस ठाणेस हजर राहत असलेबाबत सांगितले त्याप्रमाणे फॉरेन्सिक टीम १) सौ अश्विनी मारुती खोत, २) सौ सोनाली सुदर्शन कोरवी वैज्ञानिक सहायक ( संगणक गुन्हे ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण विभाग प्रादेशिक न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा कोल्हापूर ) व पंच १) गिरीष संभाजी बुजरे व व ३८ रा. दत्त कॉलनी कणेरी ता करवीर, २) वैभव रवींद्र पाटील व व २८ रा. पाटील गल्ली गोकुळ शिरगाव ता करवीर असे पोलीस ठाणेत हजर झाल्यानंतर पुन्हा फिर्यादी यांना मोबाईल हजर करणेबाबत सांगितले असता ते थोडया वेळाने पोलीस ठाणेत हजर झाले तेव्हा मुळ रेकॉर्डिंग ऐकणेकरीता त्यांचेकडे मोबाईल मागणी केला असता फिर्यादी यांनी रेकॉर्डिंग असलेला मोबाईल हा सील केला असुन तो मा न्यायालयात हजर करणेसाठी ठेवलेला आहे असे सांगितले तेव्हा आम्ही फिर्यादी यांना मुळ मोबाईल रेकॉर्डिंग गुन्हयाचे तपासकाम आवश्यक असुन तज्ञांची टीम त्याकरीता आरोपीचे व्हॉईस सॅम्पल घेणेकरीता आलेली आहे मुळ मोबाईल मधील रेकॉर्डिंग व आरोपींचे सॅम्पल असे तपासणीस पाठवुन अभिप्राय घेणेचा असुन तो आरोपीविरुध्द भक्कम पुरावा होणार आहे असे सांगितलेनंतर फिर्यादी आकाश पाटील हे मोबाईल घरी आहे घेवुन येतो असे सांगुन पोलीस ठाणेतुन निघुन गेले. बराच वेळ झाला तरी फिर्यादी हे मोबाईल घेवुन न आल्याने पुन्हा फिर्यादी आकाश पाटील यांना त्यांचा मो नं ९५०३३७९०९० यावर संपर्क साधुन विचारणा केली असता फिर्यादी आकाश पाटील यांनी मुळ रेकॉर्डिंग असलेला मोबाईल सापडत नसल्याचे सांगितलेने आरोपी यांचे व्हॉईस सॅम्पल घेता आले नाही. आज रोजी पुन्हा यातील फिर्यादी यांनी सदर गुन्हयातील मयताचा मोबाईल पोलीस ठाणेत हजर केल्याने त्याप्रमाणे फॉरेन्सिक टीम १) सौ अश्विनी मारुती खोत, २) सौ सोनाली सुदर्शन कोरवी वैज्ञानिक सहायक ( संगणक गुन्हे ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण विभाग प्रादेशिक न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा कोल्हापूर ) यांनी पंचासमक्ष आरोपी याचे व्हॉईस सॅम्पल घेणेत आलेले आहे. या व्यतिरिक्त आरोपीत याने तपासकामी अन्य काही सहकार्य केलेले नाही.

सदर गुन्हयातील आरोपी क्र १ यास अटकपूर्व वैद्यकीय तपासणी करीता घेवुन गेले असता मा वैद्यकीय अधिकारी सो यांनी त्यास अनफिट असलेबाबत सांगितल्याने त्यास सदर गुन्ह्याचे कामी अटक करणेत आलेली नाही. तो सद्या बी पी शुगर चा त्रासामुळे उपचार घेत असल्याचे समजत असुन त्याचा डिस्चार्ज होताच त्यास सदर गुन्ह्याचे तपासकामी अटक करणेची आहे. आरोपी हा उपचार घेत असले श्रध्दा हॉस्पिटल शाहुपुरी कोल्हापूर येथे जावुन मा. वैद्यकीय अधिकारी सो यांना आरोपी क्र १ याचे उपचाराबाबतची कागदपत्र मागणी केली बाबतचा रिपोर्ट सादर केला तसेच त्यांचेकडुन आरोपी क्र १ याचेवरील उपचाराबाबतचे सर्टिफिकेट प्राप्त करुन घेतले आहे.

**-: पोलीस कस्टडी रिमांड मागणेची कारणे :-**

१) सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे.

२) सदर गुन्हयातील मयत यास आरोपीत यांचेकडुन मानसिक त्रास होता का ? याबाबत आरोपीत यास विश्वासात घेवुन तपास करणेचा आहे.

३) यातील आरोपीत क्र ३ हा यातील मयत याने आरोपी क्र १ याचे कडुन पैसे घेतले होते असे सांगत आहे पण त्याने सदरचे पैसे हे शेतजमीनीच्या बदल्यात घेतले होते असे सांगतो अन्य काही माहिती देणेस टाळाटाळ करीत असुन त्यास विश्वासात घेवुन अधिक तपास करणेचा आहे.

४) सदर गुन्हयातील मयत याने आरोपी क्र १ व ३ हे खाजगी सावकारकी करीत असुन त्याचेविरुध्द गुन्हा दाखल करणेत यावा याबाबत मा सहा. निबंधक सहकारी संस्था ता करवीर यांचेकडे तक्रारी अर्ज दाखल केला होता त्याचा न्यायनिर्णय होवुन आरोपी क्र १ हा अवैद्यरित्या खाजगी सावकारकीचा व्यवसाय करीत असल्याचे सकृतदर्शनी सिध्द होत असल्याचे नमुद केले आहे. आरोपी क्र ३ हा सुध्दा आरोपी क्र १ याचे प्रत्येक व्यवहारामध्ये सामील असल्याचे फिर्यादी यांचेकडुन सांगणेत येत आहे त्याप्रमाणे आरोपीत यास विश्वासात घेवुन तपास करणेचा आहे.

५) सदर गुन्हयाचे तपासामध्ये मयत याने आत्महत्या करणेस अन्य कोणते कारण आहे का ? याबाबत आरोपीत यांना विश्वासात घेवुन तपास करणेचा आहे.

६) आरोपी क्र १ हा सद्या त्याचे बी पी शुगर चा त्रासाने उपचार घेत असल्याचे समजत असुन त्यास सदर गुन्ह्याचे तपासकामी अटक करणेची आहे. आरोपी क्र १ व ३ यांची एकत्रित चौकशी करणे गरजेच आहे.

७) यातील आरोपी क्र १ हा खाजगी सावकारकीचा व्यवसाय करीत असुन आरोपी क्र ३ हा गरजु लोकांना आरोपी क्र १ यांचेकडुन व्याजाने पैसे घेणेकरीता प्रवृत्त करीत असतो व पुन्हा आरोपी क्र १ व ३ हे संगणमताने ज्यांना व्याजाने पैसे दिले आहेत त्यांचेकडुन त्यांच्या शेतजमीनी खरदी करीत असल्याची माहिती समोर आली आहे त्या दृष्टीने तपास करणेचा आहे.

आज रोजी आरोपी क्र ३ याची पो क रिमांड संपत असल्याने वरील कारणास्तव आरोपीत यांची पो क रिमांड मिळणेकरीता न्यायालयात हजर केले आहे तरी आरोपी क्र ३ याची आज दि. २८.३.२०२५ रोजी पासुन ५ दिवस पो. क. रिमांड मिळणेस विनंती आहे.

सोबत आरोपीत यांना योग्य त्या बंदोबस्तात हजर केले आहे.

मा. सविनय सादर

**तबस्सूम जे. मगदूम**
**सहा.पोलीस निरीक्षक**
**गोकूळ शिरगांव पोलीस ठाणे**

## ORDER BELOW REMAND APPLICATION
## IN C. R. No.98/2025 OF GOKUL SHIRGAON POLICE STATION

Accused No.3 namely, Balgonda Anna Patil is produced before me by API Smt. T.J.Magdum, attached to Gokul Shirgaon Police Station, Kolhapur at 4.30 p.m. He has no complaint of ill-treatment at the hands of police. This is second production of the accused. I.O. prayed for further 5 days PCR of the accused.

**02.** Leaned APP Shri. Powar argued that during two days police custody, voice sample of the accused is collected. However, in order to detail investigation for reasons mentioned in remand report further police custody of accused is necessary. Hence, he prayed for PCR. Ld.Advocate for the de-facto complaint Shri. Powar also argued that in order to progress of the investigation and to enquire about earlier complaints filed by the deceased police custody of the accused is necessary. Hence, he prayed for PCR. On the other hand, Ld.Advocate for the accused argued that already sufficient opportunity was granted. Further, due to previous civil litigation the accused is falsely implicated in present offence. Hence, he prayed for MCR.

**03.** From perusal of case diary and remand report it appears that accused No.3 was produced before this Court on 26/03/2025. Thereafter, he is remanded in PCR till today. Further, after perusal of the case diary it appears that voice sample of the accused is collected. Furthermore, it appears that sufficient opportunity was granted. However, there is no material progress in the investigation. Moreover, it appears that for same reason earlier police custody was granted. In this situation, it would be not appropriate to enhance police custody for same reason. Accordingly, I pass following order.

**-ORDER-**

| | |
|---|---|
| 1. | Accused No.3 namely, Balgonda Anna Patil is taken into M.C.R. till 09/04/2025. |

Sd/- 28.03.2025

**Date – 28/03/2025.**
**Kolhapur.**

**(S. D. Shirsat)**
**9th Judicial Magistrate First Class,**
**Kolhapur.**

CHIEF JUDICIAL MAGISTRATE KOLHAPUR
मुख्य न्यायदंडाधिकारी कोल्हापूर

नक्कल तपासणार

खरी नक्कल
सहाय्यक अधीक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय
कोल्हापूर.